**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, JUNE-JULY, 2020, VOL- 8/40*

**'आगरकरी शैक्षणिक मूल्यांची एकविसाव्या शतकाला गरज'**

**पल्लवी रविंद्र चव्हाण**

***संशोधन विद्यार्थिनी (राज्यशास्त्र विभाग, सा.फुले पुणे विद्यापीठ, पुणे)***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक: आगरकरांना आयुर्मान अवघे एकोणचाळीस वर्षाचे लाभले त्यातील वीस बावीस वर्षे शिक्षण घेण्यास कामी आली. त्यांचे सामाजिक कार्य विसाव्या वर्षी डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतल्यावर चालू झाले. 'वऱ्हाड समाचार ' या साप्ताहिकात लेखन सुरू करून त्यांनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यास सुरुवात केली. शालेय जीवनात अनेक दर्जेदार निबंधलेखनात त्यांनी बक्षीसे मिळविली. स्वबळावर अर्थार्जन करून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यांचा शैक्षणिक प्रवास हा कऱ्हाड रत्नागिरी-अकोला-पुणे असा आहे. १८६९ साली केलेला कऱ्हाड ते रत्नागिरी हा त्यांचा प्रवास उल्लेखनीय आहे. १८७८ मध्ये बी.ए. पास होऊन त्यांनी एम.ए. साठी पुण्याच्या डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला. इतिहास व तत्त्वज्ञान या विषयाचा अभ्यास सुरू केला. येथे त्यांना टिळकांशी मित्रत्व जोडता आले आणि दोघांनी स्वराज्याविषयीचे भविष्यकालीन मनसुबे येथेच बांधले.**

**आगरकरांच्या शैक्षणिक मूल्यांचा ऊहापोह करण्यागोदर त्यांच्या आयुष्यातील लहानशा प्रसंगाचा येथे उल्लेख करावासा वाटतो. एकदा आगरकर, त्यांचे गुरुजी आणि मामा फराळास बसले असता, गुरुजी आगरकरांस पुढे काय? असा प्रश्न विचारतात. त्यामध्ये आगरकरांची शिक्षक - शाळा खात्यांची खिल्ली उडवली. त्यास आगरकर चोख उत्तर देताना म्हणाले,"माझी इच्छा शिक्षक होण्याची आहे पण ती हल्ली चालू असलेल्या रमण्यात शिरून दक्षिणा उपटण्याकरिता नाही. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसू लागतील अशा प्रकारच्या**

शिक्षणाचे काम करायचे आहे." १अशाप्रकारे आगरकरांचा निश्चय ठाम होता. शिक्षण घेताना अनेक अडचणी आल्या पण मनोधैर्य ढळू दिले नाही. त्यांचा मनातील विचार पक्का असल्याचे सांगताना ते म्हणतात, "एम .ए. होईन तरच नावाचा आगरकर !"२ म्हणजेच तत्कालीन शिक्षणातील असलेली मक्तेदारी दिसून येते.

आगरकरांचे शैक्षणिक विचार: आगरकरांनी मांडलेले शैक्षणिक विचार आजही तितकेच जीवंत वाटतात. बदलत्या काळाप्रमाणे अभ्यासक्रमात नवीन बदल आवश्यक असल्याचे ते सांगतात. यातून त्यांचा दूरदृष्टिपणा दिसून येतो. मनापासून ग्रहण केलेले कोणतेही ज्ञान कायमस्वरूपी टिकते असे म्हणता येईल. आगरकरांनी बदलत्या काळानुसार किंवा वेळेनुसार नवनवीन अभ्यासक्रमाचा उगम होणे ही काळाची गरज असल्याचे संगितले. आज आपण वेगवेगळ्या विद्यापीठांचे शाखेप्रमाणे अभ्यासक्रमानुसार सर्वेक्षण केले तर लक्षात येईल की, अमेरिका आणि युरोपातील विद्यापीठात काही विरळ अभ्यासक्रम आहेत ते आपल्या देशातील विद्यापीठात नाहीत. त्यांच्या विद्यापीठांच्या तुलनेत आपल्याकडे शिकविले जाणारे अभ्यासक्रम तुटपुंजे आहेत. याविषयी आगरकर म्हणतात की, "शरीराच्या अवयवांप्रमाणे मनाचे अवयवही अभ्यासाने आणि उपयोगाने मजबूत आणि चंचल होतात. यासाठी ज्या शिक्षणपद्धतीने विद्यार्थ्यांस ते वारंवार उपयोगात आणावे लागतील अशी पद्धती योजणे फार हितावह आहे "३ हीच शिक्षणपद्धतीही २१ व्या शतकाची गरज बनलेली दिसते.

आगरकरांच्या 'वाचन' आणि 'ज्ञान' या दोन निबंध संग्रहांचा २१ व्या शतकाला अनुसरून अभ्यास करताना लक्षात येते की, विद्यार्थी, व्यक्ति, देश आणि समाज या संकल्पना कशा कार्य करतात किंवा करणे अपेक्षित आहेत याचा उलगडा होतो. १८९० मध्ये लिहलेले हे निबंध २१ व्या शतकातही तंतोतंत लागू पडतात. हा त्यांचा मौल्यवान वैचारिक ठेवा येणारी प्रत्येक पिढी समकालीन अंगाने त्याचा अभ्यास करेल असे मला वाटते. त्यांच्या राष्ट्रभक्तीचे विशेष आणि खंतही सदर लेखनकृतीत मांडल्याचे दिसून येते. आगरकरांनी आपल्या आईला एका पत्रातून

कळविले की, "आपला मुलगा मोठ्या परीक्षा उत्तीर्ण होऊन मोठ्या पगारांची नोकरी मिळवेल आणि आपल्या हालअपेष्टा त्यानंतर संपतील, अशी स्वप्ने तू आई म्हणून बघत असशील. पण तसे होणार नाही, असे मी आत्ताच तुला सांगतो. संपत्ती आणि सुख माझ्यासाठी नाही. मला जिवनावश्यक मिळाले तरि पुरे आहे म्हणजे माझा उर्वरित वेळ इतरांच्या कल्याणासाठी मला घालविता येईल."४

वरील आगरकरांच्या लेखनकृतीमधून आपल्याला त्यांचा जिद्दीपणा, शैक्षणिक तळमळ आणि पारतंत्र्यातील समाजहिताची जाणीव प्रकर्षाने जाणवते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये युरोपातील जीवनमूल्यांचा शैक्षणिक माध्यमातून भारतीयांवर प्रभाव पडत चालला होता."आदर्श कल्पना, तत्त्वे, मानवी समाजाच्या दृष्टीने योग्य अशी ध्येये, नैतिक विचार, विचारप्रणाली, अभ्यासकाचे विचारविषयक प्राध्यान यांना 'मूल्य' असे म्हंटले जाते" ५प्रस्तुत लेखनात आपण आगरकरांच्या फक्त दोनच निबंधांवर प्रकाश टाकणार आहोत. ते म्हणजे 'वाचन' आणि 'ज्ञान' असे आहेत. या दोन निबंधांमधून आगरकरांनी अनेक शैक्षणिक मूल्यांची छटा अभ्यासली आहे. २१ वे शतक तंत्रज्ञानाचे युग म्हणू जरी ओळखले जात असले तरी तंत्रज्ञानाचे अनेक दुष्परिणाम मानवी बौद्धिक आणि शारिरीक स्थितीवर झालेले आहेत. उदाहरणार्थ मोबाईलचा अतिवापर हा डोळे आणि मेंदूचा विकार निर्माण करणारा आहे. पुस्तक वाचनाने डोळ्याला किंवा मेंदूला विकार-इजा न होता व्यक्ति परिपक्व बनतो. आगरकरांना शारिरीक श्रमांपेक्षा मानसिक किंवा बौद्धिक श्रम लोकांमध्ये जोपासले जावेत असे वाटते.

सद्यस्थितीत सुरू असलेली शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या उपयोगाचा विचार करणारी नाही. मानसिक श्रम हे शारिरीक श्रमापेक्षा अवघड आहे. आगरकर दोन्ही श्रमाची तुलना करताना लोखंडाचे उदाहरण स्पष्ट करताना म्हणतात, 'मनाची लोखंडासारखी स्थिती आहे. लोखंड वहिवाटीत नसले म्हणजे त्याला तांबोरा येऊन ते कुचकामाचे होते. पण जर त्याच्यावर नित्य घर्षण असले तर ते सतेज राहून फार दिवस टिकते.' मानसिक श्रम म्हणजे वाचन चिंतन आहे.

आज २१ व्या शतकात बहुतांशी असे दिसते आहे की, वाचनाची संस्कृती लुप्त होत चालली आहे ते केवळ आधुनिक तंत्रज्ञानामुळे. मुलांना बाजारू पठन वर्गात म्हणजे क्लासला पाठविले जाते. सधन लोकांच्या घरी खासगी शिक्षक ठेवले जातात. या पद्धतीत गरजेपुरतेच मुलांना ज्ञान कमावता येते. म्हणजेच पदवी मिळवूनही समाजात तरुणांची दशा झालेली पाहायला मिळते. या संकोचित वृत्तीमुळे मुलांची स्वतंत्र विचार करण्याची सवय मोडते.

वाचनातून सर्वात मोठा बौद्धिक विकास घडून येतो असे सांगताना आगरकर ग्रंथाचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून देतात. विचारांना ग्रंथग्रंथित करणे म्हणजे त्यास जड स्वरूप देऊन अमरत्व आणण्यासारखे आहे. त्यांना जड स्वरूप आल्याने ते आपल्या जन्मापासून पाहिजे त्यांच्या हातात जाऊ शकतात. त्यांना अमरत्व आल्याने मनुष्याच्या प्रत्येक पिढीस त्यांच्यापासून फायदे करून घेता येतात. तसेच विचाररूपी मालने भरलेल्या या ग्रंथनौका पाहिजे त्याला पाहिजे त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यातील मालास हात घालता येतो. चांगल्या पुस्तकांबरोबरच वर्तमानपत्राने ज्ञानवृद्धी होऊन त्याचा व्यवहारामध्ये उपयोग होतो. वाचनकौशल्य नेहमी जागृत ठेवण्याचे महत्त्व सांगताना ज्ञान ग्रहणकर्त्याने स्वतः स नेहमी जागृत ठेवण्यासाठी जगातील नवनवीन शोध, कल्पना, युक्त्यांचे वाचन करून त्याचा जीवनात वापर केला पाहिजे. वाचन मनुष्याचे वर्तन सुधारते व त्याला रानटीपणात राहू देत नाही असे आगरकर म्हणतात.

आगरकरांचे वरील दोन्ही निबंध वाचताना एक समीकरण मनामध्ये तयार होते की, वाचन +ज्ञान = दृष्टेपणा आणि म्हणूनच आगरकर १८९० या दशकात अमेरिका आणि युरोपिय देशांबाबतचा अभ्यास करताना त्यांचे भविष्य लिहून ठेवतात. ते म्हणतात, 'हा त्यांचा (इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, युनायटेड स्टेट्स)' व्यवसाय (संशोधन आणि नाना प्रकारच्या सुधारणा) अव्याहत चालला तर काही वर्षांनी सुधारलेल्या देशातील कोणत्याही व्यक्तीस शरीराचे रक्षण उत्तम रीतीने केल्यास अवश्यलागणाऱ्यासर्व वस्तु अल्प सायासाने मिळू लागतील इतकेच नाही तर, ऐषारामाच्याही अनेक वस्तु अत्यंत सुसाध्य होतील. असा बळकट संभव आहे. हे १८९० मध्ये मांडलेले त्यांचे

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

भाकीत २१ व्या शतकात खरे ठरल्याचे दिसून येते. असा आगरकरांचा द्रष्टेपणा त्यांच्या निबंधसंग्रहातून दिसून येतो. याचप्रकारे अजून एका जगातील शास्त्रज्ञ अलबर्ट आइनस्टाईन यांना एका मुलाखतीत विचारले गेले की, तुम्हाला आणखी एकदा जगण्याची संधी मिळाली तर आपण काय कराल? तर त्यांनी उत्तर दिले मी संपूर्ण आयुष्यभर फक्त विचार करेन. म्हणजेच या विचार मंथनातूनच ते घडले असावेत. आगरकरांनी जगभरातील प्रसिद्ध योद्धा सर्वस्वी न मानता जो व्यक्ति ज्ञानसाधनेच्या जोरावर जगभरात शांततेची दिशा देतो तोच सर्वस्वी. 'ज्याने आपल्या बुद्धिसामर्थ्याने व साधूत्त्वाने जगास वश केले तोच खरा शास्त्री व त्याचा अंमल खरोखरच भूषणावह होय' ज्ञानाचे महत्त्व पटवून देताना योगाचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे आहे. व्यक्तीचा देह, ज्ञान व विचार यामध्ये तुलना करताना देह अनंतकाळ टिकणारा नसून ज्ञान आणि विचार चिरंतर काळासाठी असल्याची शास्वती आगरकर देतात.

आगरकरांनी १८९० च्या दशकात काही खेदात्मक बाबी मांडलेल्या आहेत त्या २१ व्या शतकातदेखील सत्य ठरलेल्या आहेत. "पदवी प्राप्त झाल्यानंतर व्यवहार पाठीमागे लागतो म्हणजेच ज्ञानसंपादनास पुस्तकाशिवाय दुसरे साधन राहत नाही, शिकलेल्या लोकांपैकी शेकडा पंच्यांनवांना नोकरीत किंवा उद्योगात पडल्यावर वाचनाची व्याख्या मुळीच राहत नाही. " या प्रवृत्तीत चढउतार झाल्याचे दिसून येते. ते पुढे म्हणतात, "ठळक ठळक गोष्टींची चालू तारखेपर्यंत काय हालहवाला आहे हे माहीत नसणे म्हणजे एकुणीसाव्या शतकात जन्मास येऊन आठराव्या शतकातल्या मनुष्याप्रमाणे वागणे होय." आजही अनेक विद्यार्थ्यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी ग्रहण करूनही पुरेसे ज्ञान प्राप्त केल्याचे दिसून येत नाही. अनेक श्रीमंत आपल्या घरी खासगी शिक्षकाची नेमणूक करतात त्यामूळे विद्यार्थ्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय आपोआप नष्ट होते असा तोटा होतो अशीही खंत ते व्यक्त करतात.

तत्कालीन कालखंडात शिक्षण हे इंग्रजांची नोकरी करण्यासाठीच ग्रहण केले जात असताना आगरकरांचा शैक्षणिक कल मात्र इंग्रजी नोकरी करण्याचा मुळीच नव्हता. महाराष्ट्रात शिक्षण

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**देणारी पहिली संस्था 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना टिळक-चिपळूंकरांसोबत करून ते दाखवून दिले. अर्थर्जनापेक्षा सामाजिक व वैचारिक क्रांती अपेक्षित असलेल्या या कार्यात त्यांना अनेक अडचणी आल्या. एम.ए. ची परीक्षा पास होऊन संस्थेच्या सेवेत पूर्णवेळ झोकून दिले. 'केसरी' आणि 'मराठा' या वृत्तपत्रांची सुरुवात करून आपल्या सुधारणावादी विचारांना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविले.**

**समारोप: स्वतांत्र्यापूर्व काळात आगरकरांनी मांडलेले विविध विचार आजही वाचकांना प्रवृत्त करीत आहेत. २१ व्या शतकात बदलत्या पत्रकारितेची भूमिका मोलाची ठरते. आगरकरांनी आपल्या लेखनातून निर्भिडपणे शैक्षणिक प्रबोधनाचे कार्य केल्याचे दिसून येते. तत्कालीन प्रत्येक स्त्री-पुरुषास लिहता वाचता आले पाहिजे ही तळमळ त्यांच्या लेखनातून उजागर होते. पारतंत्र्य काळातील अशिक्षित समाजाबद्दल असलेले त्यांचे ज्ञान व उपाययोजना यांचा विचारविनिमय सदर निबंधांमध्ये झाला आहे असे दिसून येते.**

**संदर्भग्रंथ:**

*देशपांडे सुनंदा, 'गोपाळ गणेश आगरकर' , श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ-२०*
*अळतेकर माधव दामोदर, 'गोपाळ गणेश आगरकर' (चरित्र) , वरदा बुक्स,पुणे, १९३०, पृष्ठ-५०*
*प्रधान जी.पी. 'गोपाळ गणेश आगरकर' १८५६ ते १८९५ रॅशनालिस्ट ऑफ महाराष्ट, इंडियन रेनेसन्स इंस्टीट्यूट, डेहराडून, १९६२, पृष्ठ क्र. -३२२*
*व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर, 'राज्यशास्त्र कोश' , दास्ताने रामचंद्र आणि कं, पुणे, पृष्ठ-२२२*
*नातू म.गं. व दि.य. देशपांडे, 'आगरकर वाङ्मय खंड-३' म.रा. सा. आणि संस्कृती मंडल, मुंबई, पृष्ठ- ३२९*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*